महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०/२१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/९०/२०२५-२६ दिनांक :- १४/०१/२०२६

# परिपत्रक

**विषय :- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (संयुक्त गट ब व क), संघ लोकसेवा आयोग महाराष्ट्र व दिल्ली येथील परीक्षा पूर्व प्रशिक्षण २०२५-२६ करिता प्रशिक्षण संस्थेत रुजू झालेल्या विद्यार्थांना सूचना.**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाज्योती संस्थेमार्फत राबिण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (संयुक्त गट ब व क), संघ लोकसेवा आयोग महाराष्ट्र व दिल्ली येथील परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता पात्र विद्यार्थांची निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर दि.१५/१२/२०२५ व दि.२६/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करून निवड झालेल्या विद्यार्थांना संबंधित प्रशिक्षण संस्थेत रुजू होण्याकरिता दि.१०/०१/२०२६ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तथापि सदर प्रशिक्षणाकरिता निवड झालेल्या विद्यार्थांनी संबंधित प्रशिक्षण संस्थेत प्रवेश प्रकिया पूर्ण केलेली असून प्रशिक्षण योजनांचा लाभ घेण्याकरिता प्रशिक्षण संस्थेत अद्याप रुजू झालेले नसल्याचे महाज्योती कार्यालयास निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण केलेली आहे व प्रशिक्षण संस्थेत अद्याप रुजू झालले नाहीत अश्या विद्यार्थांना दि.२०/०१/२०२६ रोजी पर्यंत संबंधित प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षणाचे लाभ घेण्याकरिता हजर राहण्यासाठी सूचना निर्गमित करण्यात येत आहे. **जे विद्यार्थी दि.२०/०१/२०२६ रोजी पर्यंत प्रशिक्षण योजनेचा लाभ घेण्याकरिता प्रशिक्षण संस्थेत उपस्थित राहणार नाहीत अश्या विद्यार्थांचे प्रवेश रद्द करून पुढील प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात येईल.** सर्व संबंधित विद्यार्थांनी याची नोंद घ्यावी

**स्वा**
**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर**